Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VIII Issue – IV July – August 2019

# रवींद्रनाथ टागोर

**श्री. अमरदीप अशोक रामराजे**
*सहाय्यक प्राध्यापक*
*मातोश्री शिक्षणशास्त्र महाविद्यालय, एकलहरे, नाशिक*

रवींद्रनाथ टागोर हे एक शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, निसर्गवादी, आदर्शवादी, कवी, लेखक होते. त्यांनी गीतांजली हा ग्रंथ लिहिला. त्यांना 1913 मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले. त्याच वर्षी त्यांना कोलकत्ता विद्यापीठाने डिलीट पदवी प्रदान केली. कविता, गीते, कादंबरी, नाटक, निबंध, प्रबंध, समीक्षा, पत्र, प्रवास वर्णन ही त्यांची साहित्यसंपदा होय. रवींद्रनाथ टागोर यांनी सत्यम शिवम यांना महत्त्व दिले.

रवींद्रनाथ टागोरांचा जन्म 7 मे 1861 रोजी बंगालमधील कोलकाता येथे झाला. त्यांचे वडील देवेंद्रनाथ टागोर होय. ते एक तत्त्वचिंतक, देशभक्त, धर्मप्रिय होते. रवींद्रनाथ टागोर यांचे घराणे विद्वान, प्रगतीशील, सुसंस्कृत, कलासंपन्न होते. त्यांना तत्त्वज्ञानाचा वारसा वडिलांकडून प्राप्त झाला होता. तर संगीत, नृत्य कलेचा वारसा आपल्या भावंडाकडून मिळालेला होता.

रवींद्रनाथ टागोर यांचे शिक्षण विषयक विचार

रवींद्रनाथ टागोर यांना असे वाटत होते की बालकांना निसर्गाच्या सान्निध्यात शिक्षण द्यायला हवे. तसेच त्यांना अध्ययन करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य असावे. बालकांना अध्ययनासाठी नैसर्गिक मार्गांचा अवलंब त्यांनी केला. यासाठी त्यांनी शाळेची स्थापना केली. ही शाळा निसर्गरम्य वातावरणात होती. निसर्गरम्य वातावरणमुळे बालकांमध्ये स्वातंत्र्य, संवेदनशीलता आणण्यास मदत मिळू शकते व बालक चांगल्या प्रकारे अध्ययन कार्य करू शकतो. म्हणून अध्यापन या नैसर्गिक वातावरण केले पाहिजे असे त्यांना वाटत होते. शिक्षणाद्वारे बालकांचा सर्वांगीण विकास होतो असे रवींद्रनाथ टागोर यांना वाटत होते. यासाठी मानसिक, शारीरिक, बौद्धिक विकास होण्यासाठी या प्रत्येकामध्ये समतोल साधणे आवश्यक आहे. पालक आणि समाज यांच्यामध्ये योग्य प्रकारे सुसंवाद शिक्षणाद्वारे साधणे आवश्यक आहे. जेणेकरून बालकाचा विकास चांगला होऊ शकतो. निसर्गाच्या सानिध्यात बालकांनी अध्ययन केले तर त्याचा परिणाम अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकतो हे रविंद्रनाथ टागोर यांना वाटत होते. बालकांना मानसिक स्वातंत्र्यासाठी शिक्षण देणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. शिकण्यासाठी बालकाला त्यांच्या आवडीनुसार विषय निवडण्याचे स्वातंत्र्य असावे. संगीत, भरतकाम, नृत्य, गृहविज्ञान यासारखे विषय निवडण्याचे स्वातंत्र्य मुलींना असायला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार हे विषय त्यांना दिल्यास त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळेल असे वाटते. त्यांनी प्रत्यक्ष कृतीवर भर दिला होता. रवींद्रनाथ टागोर यांचा कल अध्यात्मिक शिक्षणाकडे होता. बालकात मानवी जीवनाचे उच्चतम असे उद्दिष्ट आहे त्यांचा मोकळ्या वातावरणात आत्मिक विकास होऊन ते पूर्णत्वाला जाऊ शकतात. यावरून बालकाचा आत्मिक विकास घडवून आणण्यासाठी नैसर्गिक वातावरणातच शिक्षण देणे हे आवश्यक आहे. रवींद्रनाथ टागोरांना

Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VIII Issue – IV July – August 2019

मातृभाषेतून शिक्षण द्यावे असे वाटत होते. मातृभाषेतून शिक्षण दिल्यामुळे बालकाला कोणतीही गोष्ट समजून घेणे सोपे जाईल. त्यामुळे त्याच्या बुद्धीला चांगली चालना मिळू शकेल. बालकांमध्ये स्वयंशिस्त असणे गरजेचे आहे असे त्यांना वाटते. शिक्षण हे पुस्तकी ज्ञानापेक्षा जीवनाशी संबंधित असावे. रवींद्रनाथ टागोर हे निसर्गवादी होते. अध्यापन अध्ययन कार्य हे निसर्गाच्या सानिध्यात झाले तर त्याचा निश्चितच चांगला परिणाम होऊ शकतो असे त्यांना वाटते. बालकाचे भविष्यातील जीवन सुखकर आणि चांगले करायचे असेल तर त्याला जीवनात उपयुक्त असलेले अनुभव व ज्ञान देणे गरजेचे आहे यासाठी परिस्थितीजन्य निरीक्षणाद्वारे अध्यापन कार्य करणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. रवींद्रनाथ टागोर यांनी चारित्र्यावर अधिक भर दिला आहे. चारित्र्य संवर्धन करण्यासाठी योग्य अशी वातावरण निर्मिती करणे गरजेचे आहे. त्या वातावरणनिर्मितीमध्येच शिक्षण हे महत्त्वाचे कार्य करत असते. बालकाचे चारित्र्य व्यवस्थितपणे घडविण्यासाठी त्या पद्धतीने शिक्षणाची व्यवस्था करणे गरजेचे असते आणि निसर्गरम्य वातावरण हे त्यासाठी मदत करत असते.

रवींद्रनाथ टागोर यांच्या मते शिक्षणाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होते.

1. बालकाचा सर्वांगीण विकास करणे.
2. बालकाचा शारीरिक विकास करणे.
3. बालकाचा मानसिक विकास करणे.
4. बालकाचा नैतिक व आध्यात्मिक विकास करणे.
5. बालकाचा नैसर्गिक वातावरणाशी समन्वय साधणे.
6. बालकामध्ये विश्वबंधुत्वचा विकास करणे.

**रवींद्रनाथ टागोर यांचे शैक्षणिक कार्य**

रवींद्रनाथ टागोर यांचे वडील देवेंद्रनाथ टागोर यांनी ब्रह्मचर्याश्रमची स्थापना केली होती. याचेच नाव पुढे रवींद्रनाथ टागोरांनी शांतिनिकेतन ठेवले. रवींद्रनाथ टागोर यांनी शांतिनिकेतनमध्ये आश्रम पद्धतीच्या शिक्षणाची सोय केली होती. हे शिक्षण निसर्गरम्य वातावरणात देण्यात येत असे. विद्यार्थी झाडाखाली बसून शिक्षण घेत असे. विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे व श्रमप्रतिष्ठेचे शिक्षण दिले जात असे. संगीत, नाट्य, नृत्य, साहित्य यांचा अभ्यास करण्यात येत असे. विद्यार्थी एकत्रपणे वसतिगृहात राहून जेवण घेत. मातृभाषेतून शिक्षण देण्याची सोय करण्यात आलेली होती. हिंदी, इंग्रजी व मातृभाषा या त्रीभाषांचापण अंगीकार करण्यात आलेला होता. कृतीद्वारे शिक्षण या तत्त्वावर हे शिक्षण कार्य चालत होते. येथे नैसर्गिक स्वरूपाला हवा होता, या वातावरणाचा बालक व शिक्षक हे दोघेही अनुभव घेत होते.

शांतिनिकेतन येथे रवींद्रनाथ टागोर यांनी विश्वभारती नावाचे आंतरराष्ट्रीय विद्यापीठ स्थापन केले. या विद्यापीठात पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतीचा संगम करण्यात आलेला होता. येथे विविध धर्माच्या व राष्ट्रीयत्वाच्या शिक्षकांना, विद्यार्थ्यांना राहण्याची सोय व शिक्षण देण्याची सोय करण्यात आली होती. येथील वातावरण घरगुती व आध्यात्मिक स्वरूपाचे असे होते.

रवींद्रनाथ टागोर यांनी श्रीनिकेतनची स्थापना कोलकत्ता मध्ये केली. खेड्यातील जनतेला शिक्षण देण्याचा त्यामागील उद्देश होता. यासाठी नैसर्गिक साधन सामग्रीचा वापर करणे व त्यांचा विकास करणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले होते. श्रीनिकेतनमध्ये शिक्षण, चर्चा, कृषी, समाजकार्य याप्रकारचे शिक्षण कार्य चालले जात होते. या श्रीनिकेतनमध्ये समावेश विश्वभारती विद्यापीठाअंतर्गत केलेला होता. श्रीनिकेतनमध्ये ग्रामीण जीवनाची समस्या, सामाजिक, आर्थिक अडचणी–समस्या सोडविण्यावर भर देण्यात आला होता. श्रीनिकेतनमध्ये ग्रामीण भागातील मुलांसाठी माध्यमिक शाळा, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची सोय करण्यात आलेली होती.

**संदर्भसूची –**

1. राजमाने, क.च ( 2011 ). शिक्षणातील थोर विचारवंत : एक चिंतन, नाशिक : इनसाईट पब्लिकेशन
2. बनकर, बी.एम ( 2004 ). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, नाशिक : सुहास प्रकाशन
3. https://en.wikipedia.org/wiki/Rabindranath_Tagore